Source:- Punyanagari

Date:-13 July 2022 P. No. 2

पुण्य नगरी

# उच्च व तंत्रशिक्षणच्या प्रधान सचिवांची ‘आयआयएमएन’ला भेट



**नागपूर :** महाराष्ट्र राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांनी रविवार, १० जुलै रोजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर (आयआयएमएन नागपूर) ला भेट दिली. आयआयएम नागपूर येथे विकसित केलेल्या सुविधांवर समाधान व्यक्त करताना ‘आयआयएमएन’ नवोदित व्यवस्थापन व्यावसायिकांना विविध पर्याय उपलब्ध करून देते, उदयोन्मुख ट्रेंड आणि उद्योगांच्या गरजांनुसार येथील अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे. या कार्यक्रमांचा फोकस तरुण पदवीधरांमध्ये उद्योगाला जाणवणारी दरी भरून काढणे हा असल्याचे रस्तोगी यावेळी म्हणाले. भारताच्या लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा विचार करता या क्षेत्रात अशा अधिकाधिक संस्थांची गरज आहे, ज्यामुळे होतकरू विद्यार्थ्यांना पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळेल, असे मत त्यांनी नोंदविले. यावेळी आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मैत्री उपस्थित होते.